Any person who acquires shares and becomes the Members of the Company after the sending the Notice of the AGM through electronic mode but before the cut-off date of Wednesday, August 19, 2026 and whose name is recorded in the Register of Members or in the Register of Beneficial Owners maintained by the Depositories, can view the Notice of the AGM on the website of the Company, i.e. *www.igxindia.com* or on the website of the Company's Registrar and Share Transfer Agent, i.e. *evoting.kfintech.com* and can obtain their user id and password for the remote e-voting by sending a request at CDSL's e-mail id: *helpdesk.evoting@cdslindia.com* or NSDL's e-mail id: *evoting@nsdl.co.in* or Company's e-mail id: *compliance@igxindia.com*. However, if a person is already registered with CDSL/NSDL for remote e-voting then existing user id and password can be used for casting vote. The information regarding scrutiniser, dividend, the deduction of tax on such dividend (TDS), and other pertinent details is included in the Notice of the AGM. To assist us in determining the applicable TDS rate, the Members are kindly requested to submit necessary documents on or before Friday, August 21, 2026.

By the order of the Board of Directors
For **Indian Gas Exchange Limited**
Sd/-
Priyanka Nautiyal
Company Secretary & Compliance Officer
Membership No.: ACS 20001

Place: Noida
Date: August 5, 2026

KRISHANVEER FORGE LIMITED

CIN: L28910PN1990PLC056985
REGD OFF.: OFFICE NO. 511 TO 513, GLOBAL SQUARE, S. NO. 247, 14B, YERAWADA, PUNE - 411 006
Email ID: invest@kvforge.com Phone No. 8956616160 Website: www.kvforge.com

EXTRACT OF STATEMENT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2026

(INR in Lakhs except Earnings Per Share)

Sr. No.	Particulars	Quarter ended			Year ended
		30.06.2026 Unaudited	31.03.2026 Audited	30.06.2025 Unaudited	31.03.2026 Audited
1	Revenue from Operations	2,259.435	2,481.768	2,397.037	9,060.180
2	Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items)	275.677	371.717	260.110	1,182.031
3	Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items)	275.677	720.788	260.110	1,456.422
4	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items)	199.596	575.489	207.086	1,137.715
5	Total comprehensive income for the period {Comprising profit for the period (after tax) and other comprehensive income (after tax)}	204.119	582.863	205.145	1,155.804
6	Equity share capital	1,093.940	1,093.940	1,093.940	1,093.940
7	Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year				4,049.644
8	Earnings per share (of Rs.10 each) (for continuing and discontinued operations)				
	Basic:	1.825	5.261	1.893	10.400
	Diluted:	1.825	5.261	1.893	10.400

N o t e s : -

1 The above is an extract of the detailed format of Financial Results for the Quarter ended on June 30, 2026 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular dated July 05, 2016. The full format of the said Financial Results is available on the Stock Exchange website https://www.bseindia.com/xml-data/corpfiling/AttachLive/1e7f9ada-3fcb-489f-a44c-bcfae52c167a.pdf and on the Company's website https://kvforge.com/media/Unudited-Financial-Results-for-the-Quarter-ended-June-30-2026.pdf and also can be accessed by scanning the QR codes below.

2 The above financial results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company at their meeting held on August 05, 2026

QR Code for BSE website

QR Code for Company's Website

For **Krishanveer Forge Limited**
Nitin Rajore
Whole Time Director
DIN: 01802633

Place : **Pune**
Date : **August 05, 2026**

अपुऱ्या विश्रांतीमुळेच दुखापतींत वाढ!

व्यग्र कार्यक्रमात कार्यभार व्यवस्थापन महत्त्वाचे; तज्ज्ञांचे मत

एक्स्प्रेस वृत्त

चेन्नई : श्रीलंकेविरुद्धच्या आगामी दोन कसोटी सामन्यांच्या महत्त्वपूर्ण मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट संघाला प्रमुख खेळाडूंच्या दुखापतींना सामोरे जावे लागत आहे. तारांकित वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा दुखापतीमुळे मालिकेत खेळू शकणार नाही, तर अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदरच्या उपलब्धतेबाबत साशंकता आहे. युवा फलंदाज साई सुदर्शन बंगळूरुतील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये (सीओई) पुनर्वसन करत असून त्याच्या तंदुरुस्तीबाबतही संभ्रम आहे. त्यामुळे 'सीओई'च्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत असतानाच, आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या व्यग्र कार्यक्रमात खेळाडूंचे कार्यभार व्यवस्थापन सर्वांत महत्त्वाचे झाले असून अपुऱ्या विश्रांतीमुळे दुखापतींचे प्रमाण वाढल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

सततचे क्रिकेट, विश्रांतीचा अभाव, विविध प्रकारच्या क्रिकेटमधील अपुरे संक्रमण, सर्वोत्तम कामगिरीसाठी वाढता ताण आणि दुखापतीनंतर घाईने मैदानात पुनरागमन, हीच दुखापतींची मुख्य कारणे असल्याचे भारतीय संघाचे माजी 'स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग' प्रशिक्षक रामजी श्रीनिवासन यांनी नमूद केले.

''पूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंना काही आठवडे पूर्ण विश्रांती मिळत होती. तो काळ शारीरिकदृष्ट्या अधिक बळकट होण्यासाठी, तंदुरुस्तीत सुधारणेसाठी आणि पुढील हंगामाच्या तयारीसाठी वापरला जायचा. आता मात्र वर्षाचे बाराही महिने कसोटी, एकदिवसीय, ट्वेन्टी-२०, 'आयपीएल' आणि इतर लीग सुरू असल्याने खेळाडूंना विश्रांतीच मिळत नाही. कार्यभार, प्रशिक्षण आणि 'रिकव्हरी' यात योग्य समन्वय नसेल, तर दुखापती अटळ आहेत,'' असे श्रीनिवासन म्हणाले.

'आयपीएल'नंतर खरी कसोटी

''आयपीएलमध्ये खेळाडू जवळपास दोन महिने सातत्याने सामने खेळतात. त्या काळात शरीरावर मोठा ताण येतो. त्यामुळे सरावापेक्षा शरीराची झिज भरून काढण्यालाच (रिकव्हरी) प्राधान्य दिले जाते. परंतु 'आयपीएल'नंतर लगेच आंतरराष्ट्रीय सामने खेळताना ताण अचानक वाढतो. विशेषतः कसोटी क्रिकेटसाठी आवश्यक असलेली तंदुरुस्ती, लांब स्पेल टाकण्याची क्षमता आणि दीर्घकाळ फलंदाजी करण्यासाठी वेगळे प्रशिक्षण आवश्यक असते. हे संक्रमण योग्य पद्धतीने न झाल्यास स्नायूंच्या दुखापती, गुडघा किंवा मांडीच्या पुढील भागात त्रास वाढण्याची शक्यता अधिक असते,'' असेही श्रीनिवासन यांनी सांगितले.

दुखापतींचे वाढते प्रमाण

गेल्या काही काळात भारतीय खेळाडूंच्या दुखापतींचे प्रमाण वाढले आहे. ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेदरम्यान बुमराचा गुडघा दुखावला. पुढे ती दुखापत आणखी बळावली. अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर तंदुरुस्त होऊन संघात परतला, पण इंग्लंडमध्ये त्याला पायाची दुखापत झाली. नितीश कुमार रेड्डीने गोलंदाजीचा वेग वाढवण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर त्याच्या मांडीच्या पुढील भागाला दुखापत झाली. हर्षित राणा आधी गुडघ्याच्या दुखापतीमुळे बाहेर पडला, त्यानंतर त्याला तंदुरुस्ती मिळवणे अवघड गेले. त्यामुळे भारतीय संघ अडचणीत सापडला.

पुनरागमनाची घाई?

- अलीकडच्या काळात काही खेळाडू दुखापतीनंतर पूर्णपणे तंदुरुस्त होण्यापूर्वीच त्यांना भारतीय संघात स्थान दिले जात असल्याची चर्चा रंगली आहे. अफगाणिस्तानविरुद्ध एकदिवसीय मालिकेपूर्वी हार्दिक पंड्याला तंदुरुस्त घोषित करण्यात आले, पण मालिकेला सुरुवात होणार त्याआधी तो पुन्हा जायबंदी झाला.
- बुमरालाही श्रीलंकेविरुद्ध कसोटी मालिकेत खेळण्याची परवानगी देण्यात आली, पण काही दिवसांतच तो पुन्हा जायबंदी झाला. त्यामुळे 'सीओई' येथील डॉक्टरांवर प्रश्न उपस्थित करण्यात आले.
- तंदुरुस्ती चाचणीत उत्तीर्ण होणे आणि पूर्ण स्पर्धात्मक तंदुरुस्ती मिळवणे या दोन वेगळ्या गोष्टी असल्याचे तज्ज्ञ सांगतात. पूर्वी दुखापतीतून परतणाऱ्या खेळाडूंना सराव सामने खेळून स्वतःची तयारी सिद्ध करावी लागत होती. आता मात्र काही प्रकरणांत हा निकष शिथिल झाल्याचे बोलले जात आहे.

उपाय काय ? भारतीय संघाचे माजी 'स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग' प्रशिक्षक रामजी श्रीनिवासन यांच्या मते, प्रत्येक प्रारूपासाठी स्वतंत्र नियोजन करणे अत्यावश्यक आहे. 'आयपीएल'नंतर कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंसाठी विशेष शिबीर आयोजित करणे, कामाचा ताण टप्प्याटप्प्याने वाढवणे, 'रिकव्हरी'साठी पुरेसा कालावधी देणे आणि दुखापतीतून परतताना कोणतीही घाई न करणे हेच दीर्घकालीन उपाय आहेत. ''सहा महिने स्फोटक ट्वेन्टी-२० क्रिकेट खेळल्यानंतर लगेच कसोटी क्रिकेट खेळणे म्हणजे उसेन बोल्टला मॅरेथॉन धावायला सांगण्यासारखे आहे. शरीराला त्या बदलासाठी वेळ द्यावा लागतो,'' असे श्रीनिवासन यांनी सांगितले.

राष्ट्रकुलमधील जलतरण, सायकलिंगच्या अपयशाने चिंता

'साइ', क्रीडा मंत्रालयासमोर आव्हान

पीटीआय, नवी दिल्ली

राष्ट्रकुल स्पर्धेतील यशानंतर क्रीडा आणि प्रशासकीय अशा दोन्ही पातळ्यांवर भारतीय क्रीडा प्राधिकरण (साइ) आणि क्रीडा मंत्रालयासमोर 'थोडी खुशी, थोडी चिंता' अशी स्थिती निर्माण झाली आहे. भारतीय खेळाडूंच्या एकूण जडणघडणीची जबाबदारी सांभाळणाऱ्या 'साइ'ला अपेक्षेपेक्षा अधिक पदके मिळाल्याचा आनंद असला, तरी खेळाडूंचे व्यवस्थापन आणि त्यांची कामगिरी याबाबत काही प्रश्न अजूनही अनुत्तरितच आहेत.

राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि ९ कांस्य अशी एकूण ३९ पदके जिंकली. त्यामुळे 'साइ'ला समाधान वाटत असले, तरी जलतरण आणि सायकलिंगमध्ये खातेही उघडता आले नाही, ही बाब चिंतेची ठरली आहे. त्याच बरोबर खेळाडूंना आवश्यक साहित्य वेळेवर उपलब्ध न होण्यासारख्या प्रशासकीय अडचणीही समोर आल्या आहेत.

ज्युदोमध्ये दोन सुवर्णांसह चार पदकांची कमाई ही या स्पर्धेतील सर्वांत उल्लेखनीय कामगिरी ठरली. मात्र, जलतरण, सायकलिंगमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणावर सुधारणा आवश्यक असल्याचे या स्पर्धेने पुन्हा अधोरेखित केले. बॉक्सिंगमधील यश

ही दुसरी सकारात्मक बाब असली, तरी यंदा त्या स्पर्धेतील स्पर्धात्मक आव्हान तुलनेने कमी होते. ''ही चूक आमची नाही. समोर जो प्रतिस्पर्धी असेल त्याच्याविरुद्ध सर्वोत्तम कामगिरी करण्याची तयारी महत्त्वाची असते,'' असे 'साइ'च्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. वेटलिफ्टिंगमध्ये मीराबाई चानूसह आणखी एका सुवर्णपदकाची अपेक्षा होती, पण ती पूर्ण झाली नसल्याचेही त्यांनी मान्य केले.

काही प्रशासकीय त्रुटीही स्पष्टपणे समोर आल्या आहेत. खेळाडूंना आवश्यक साहित्य वेळेवर न मिळण्यासारख्या समस्यांवर तोगडा काढण्यासाठी भविष्यात संघाबरोबर स्वतंत्र समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा विचार केला जाऊ शकतो. मात्र, स्पर्धा सुरू होण्यापूर्वी २५ पदकांचा अंतर्गत अंदाज व्यक्त करण्यात आला असताना अंतिम पदकसंख्या ३९ वर पोहोचली आणि भारताने चौथे स्थान मिळवले, त्यामुळे सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला, असेही या अधिकाऱ्याने नमूद केले.

दुखापत व्यवस्थापनात लक्षणीय सुधारणा झाल्याचे तेजस्विन शंकरच्या कामगिरीवरून दिसून आले. मात्र, दुखापत असतानाही तेजस शिरसेला २०० मीटर शर्यतीत उतरवण्याच्या निर्णयाबाबत अद्याप कोणीही स्पष्टपणे बोलण्यास तयार नाही. या दुखापतीमुळे तेजसला आता संपूर्ण हंगामालाच मुकावे लागणार आहे. दुखापत असूनही त्याला स्पर्धेत उतरवण्याचा निर्णय नेमका कुणी घेतला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

तन्वीची आगेकूच; श्रीकांत पराभूत

आसान (कोरिया) : गेल्याच आठवड्यात तैपेइ स्पर्धेची विजेती ठरलेल्या तन्वी शर्माने कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत लय कायम राखताना विजयी सलामी दिली. पुरुषांमध्ये मात्र भारताच्या किदम्बी श्रीकांतचे आव्हान संपुष्टात आले.

तिसऱ्या मानांकित तन्वीनेने चीनच्या युआन आन कीला २१-१६, २१-१५ असे पराभूत करत दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले. अन्य लढतीत रक्षित रामराजने यू ए येओनला २२-२४, २१-१२, २१-१३ असे नमवले. पुरुष एकेरीत श्रीकांतने इस्रायलच्या डॅनिल दुबोवेन्कोकडून २०-२२, २१-१४, १२-२१ अशी हार पत्करली.

सूरज अंतिम फेरीत

मुंबई : भारताच्या सूरज चंदने जागतिक विद्यापीठ स्क्वॉश स्पर्धेत पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले, तर ओम सेमवाल उपांत्य फेरीत पराभूत झाल्याने त्याला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात सूरज चंदने फ्रान्सच्या जॅक्स-फिनेरा जॉश्वाला ३-२ अशा फरकाने नमवत अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले. अंतिम फेरीत त्याच्यासमोर हंगेरीच्या टकाक्स बेनेडेकचे आव्हान असेल. बेनेडेकने ओम सेमवालला सरळ गेममध्ये नमवले.

जागतिक बॅडमिंटन स्पर्धेपूर्वी स्टेडियममध्ये मोठ्या सुधारणा

दुरुस्ती कामांबाबत महासंघ समाधानी

पीटीआय, नवी दिल्ली

जानेवारीत झालेल्या 'इंडिया ओपन' स्पर्धेदरम्यान स्वच्छतागृहांची दुरावस्था, तसेच स्टेडियममध्ये कबुतरे व माकडांचा वावर यामुळे टीकेचे धनी ठरलेल्या इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये आता मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्यात आल्या असून, जागतिक अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी या कामांबाबत जागतिक बॅडमिंटन महासंघाने (बीडब्ल्यूएफ) समाधान व्यक्त केले आहे.

'बीडब्ल्यूएफ'चे स्पर्धा संचालक सेल्वाअमरेश सुप्रमण्यम यांनी सांगितले की, ''गेल्या सात महिन्यांत विविध टप्प्यांत स्टेडियमची पाहणी करण्यात आली. या काळात स्वच्छतागृहांचे संपूर्ण नूतनीकरण, सखोल स्वच्छता, तुटलेल्या आसनांची दुरुस्ती व बदल, विद्युत वायरिंगची दुरुस्ती, छताची पुनर्बांधणी आणि पावसाचे पाणी गळू नये यासाठी वॉटरप्रूफिंग अशी अनेक कामे पूर्ण करण्यात आली.''

तसेच स्टेडियममध्ये पक्षी घुसू नयेत यासाठीही विशेष उपाययोजना करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. गेल्या तीन दिवसांत स्टेडियममध्ये एकही कबूतर किंवा माकड दिसले नसल्याचे त्यांनी नमूद केले. भारतीय क्रीडा प्राधिकरणाने (साइ) परिसरातील सुमारे ६० भटक्या कुत्र्यांना हटवल्याचे सांगण्यात आले.

सिंधूचा मार्ग सुकर : जागतिक बॅडमिंटन स्पर्धेची कार्यक्रमपत्रिका (ड्रॉ) बुधवारी जाहीर करण्यात आली. पीव्ही सिंधूला अव्वल खेळाडू आन से यंग आणि गतविजेती अकाने यामागुची यांसारख्या तगड्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळावे लागणार नाही. सलामीला तिची क्रमवारीत ९४१व्या स्थानी असलेल्या सोफिया नोबेलशी गाठ पडेल.

प्रणव घोलकर, स्वरदा सानेला विजेतेपद

पुणे : पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटने तर्फे आयोजित व माजी टेबल टेनिसपटू यांच्या वतीने पुरस्कृत बालुफ ऑटोमेशन प्लेअर्स चषक पुणे जिल्हा टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रणव घोलकर, तर मुलींच्या गटात स्वरदा साने हिने विजेतेपद मिळवले.

'शारदा स्पोर्ट्स सेंटर' येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुलांच्या गटातील अंतिम फेरीत तिसऱ्या मानांकित प्रणव घोलकर याने निशाद लेलेचा ११-९, ११-९, ९-११, ११-७, ११-३ असा पराभव केला. प्रणव एमआयटी डब्लूपीयु कॉलेजमध्ये अभियांत्रिकी शाखेत प्रथम वर्षाला शिकत असून पीवायसी टॉस टेबल टेनिस अकादमीत प्रशिक्षक दिपेश अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो.

मुलींच्या गटात अंतिम लढतीत जळगावच्या तिसऱ्या मानांकित स्वरदा साने हिने नीरजा देशमुख हिचा ११-२, ११-५, ११-८, ११-८ असा सरळ चार गेममध्ये पराभव करून विजेतेपद मिळवले. स्वरदा छत्रपती राजे संभाजी महाविद्यालयात विज्ञान शाखेत अकरावी इयत्तेत शिकत असून इंडिया खेलेगा टेबल टेनिस अकादमीत प्रशिक्षक सन्मय परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.

४० वर्षांवरील पुरुष गटात उपांत्यपूर्व फेरीत सुयोग पाटीलने संजय पटेलला ११-७, ११-४, ११-६ असे, स्वानंद बेडेकरने ओंकार जोगला ११-६, ९-११, १२-१०, ११-६ असे नमवले.

KRISHANVEER FORGE LIMITED

CIN: L28910PN1990PLC056985

REGD OFF.: OFFICE NO. 511 TO 513, GLOBAL SQUARE, S. NO. 247, 14B, YERAWADA, PUNE - 411 006

Email ID: invest@kvforge.com Phone No. 8956616160 Website: www.kvforge.com

EXTRACT OF STATEMENT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2026

(INR in Lakhs except Earnings Per Share)

Sr. No.	Particulars	Quarter ended			Year ended
		30.06.2026 Unaudited	31.03.2026 Audited	30.06.2025 Unaudited	31.03.2026 Audited
1	Revenue from Operations	2,259.435	2,481.768	2,397.037	9,060.180
2	Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items)	275.677	371.717	260.110	1,182.031
3	Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items)	275.677	720.788	260.110	1,456.422
4	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items)	199.596	575.489	207.086	1,137.715
5	Total comprehensive income for the period {Comprising profit for the period (after tax) and other comprehensive income (after tax)}	204.119	582.863	205.145	1,155.804
6	Equity share capital	1,093.940	1,093.940	1,093.940	1,093.940
7	Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year				4,049.644
8	Earnings per share (of Rs.10 each) (for continuing and discontinued operations)				
	Basic:	1.825	5.261	1.893	10.400
	Diluted:	1.825	5.261	1.893	10.400

Notes :

1 The above is an extract of the detailed format of Financial Results for the Quarter ended on June 30, 2026 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular dated July 05, 2016. The full format of the said Financial Results is available on the Stock Exchange website https://www.bseindia.com/xml-data/corpfiling/AttachLive/1e7f9ada-3fcb-489f-a44c-bcfae52c167a.pdf and on the Company's website https://kvforge.com/media/Unudited-Financial-Results-for-the-Quarter-ended-June-30-2026.pdf and also can be accessed by scanning the QR codes below.

2 The above financial results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company at their meeting held on August 05, 2026

Place : **Pune**

Date : **August 05, 2026**

QR Code for BSE website

QR Code for Company's Website

For **Krishanveer Forge Limited**
Nitin Rajore
Whole Time Director
DIN: 01802633

व्याजदर जैसे थे; आर्थिक विकासाला प्राधान्य

रिझर्व्ह बँकेकडून 'जीडीपी' वाढीचा अंदाज ६.७ टक्क्यांवर

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : रिझर्व्ह बँकेने सलग चौथ्या द्विमासिक पतधोरणातून व्याजदरात कोणताही बदल न करता ते स्थिर ठेवण्याचा निर्णय बुधवारी घेतला. महागाईबाबत अधिक स्पष्टता येईपर्यंत सावध पवित्रा घेताना, आर्थिक विकासाला प्राधान्य देणारे मध्यवर्ती बँकेचा धोरणात्मक सूर दिसून आला. त्यामुळे गृह कर्ज, वाहन कर्जाचे व्याजदर आणि मासिक हप्त्यांमध्ये तूर्त कोणताही दिलासादायी बदल सर्वसामान्यांना दिसणार नाही.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखालील सहा सदस्यीय पतधोरण समितीने 'रेपो दर' ५.२५ टक्क्यांवर स्थिर ठेवण्याचा एकमुखी निर्णय घेतला. याचबरोबर पतधोरणाबाबत 'तटस्थ' भूमिकाही कायम ठेवण्यात आली.

पतधोरण समितीच्या बैठकीतील निर्णयांची घोषणा करताना संजय मल्होत्रा म्हणाले की, नजीकच्या काळात महागाई दरात वाढ होणे अपेक्षित आहे. चालू आर्थिक वर्षातील तिसऱ्या तिमाहीत महागाई दरात जास्त वाढ होईल. खाद्यवस्तू आणि इंधनाची महागाई यासाठी कारणीभूत ठरेल. मौल्यवान धातू वगळता इतर क्षेत्रांतील महागाईची (कोअर इन्फ्लेशन) पातळी सौम्य आहे. त्यामुळे तातडीने पतधोरणात कठोर भूमिका घेण्याची आवश्यकता नाही, असे स्पष्ट करण्यात आले.

विकास दरात वाढीचे अनुमान

रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) वाढीचा दर ६.७ टक्के राहील, असा सुधारित अंदाज व्यक्त केला. याआधी जूनमध्ये हा अंदाज ६.९ टक्क्यांवरून, ६.६ टक्के असा घटला होता. आता त्यात वाढ करण्यात आली आहे. युद्धामुळे पुरवठा साखळीवर झालेला परिणाम जूनपासून काही प्रमाणात कमी झाला आहे. मात्र, हा संघर्ष पुन्हा सुरू झाल्याने इंधनाच्या किमतीसोबत पुरवठा साखळीबाबत अस्थिरता निर्माण झाली आहे.

एल निनोचे सावट

चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाईचा दर ५ टक्के राहील, असा अंदाज रिझर्व्ह बँकेने वर्तविला आहे. याआधी जून महिन्यात हा अंदाज ५.१ टक्के होता. देशांतर्गत मागणीतील वाढ, निर्मिती व सेवा क्षेत्रांची सक्रियता आणि चांगली निर्यात यामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळत आहे. युद्ध आणि जागतिक पातळीवरील व्यापार तणाव सुरू असतानाही अर्थव्यवस्थेची कामगिरी चांगली आहे. मात्र, एल निनो परिस्थिती, प्रतिकूल घडामोडी यामुळे महागाई दराबाबत अनिश्चित चित्र आहे.

द्वारकादास मंत्री बँकेला २.११ कोटींचा नफा

बीड : द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बीड शहरातील बालाजी मंदिर सभागृहात नुकतीच पार पडली. बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात २.११ कोटींचा नफा प्राप्त केला आहे.

बँकेचे एकूण भागभांडवल १,७८२.१८ लाख रुपये आहे. बँकेच्या ठेवी ६५.७१ कोटी रुपये तर एकूण कर्ज वाटप ५८.२४ कोटी रुपये इतके आहे.

बँकेची एकूण गुंतवणूक ८०.०७ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. यापैकी ७०.०१ कोटी रुपयांची गुंतवणूक ही शासकीय रोख्यामध्ये आहे, जी रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या आवश्यकतेपेक्षा सात पटीने अधिक आहे. ३१ मार्च २०२६ अखेर बँककडे एकूण तरलता निधी ९२.३२ कोटी रुपये एवढा उपलब्ध आहे. जो बँकेच्या एकूण ठेवीच्या १४५ टक्के पेक्षा जास्त आहे. म्हणजेच कर्ज वाटपासाठी बँककडे मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध असून बँकेच्या सभासदांना विविध योजनांद्वारे कर्ज वाटपाचे धोरण संचालक मंडळाने आखले आहे.

सेवा क्षेत्राला घरघर

पीटीआय, नवी दिल्ली

देशातील सेवा क्षेत्राला सरलेल्या जुलै महिन्यात घरघर लागली असून, वाढीचा दर साडेचार वर्षांतील नीचांकी पातळीवर घसरला आहे. देशांतर्गत आणि निर्यात बाजारपेठेतून नवीन कार्यादेशात झालेली घट यासाठी कारणीभूत ठरल्याचे बुधवारी जाहीर झालेल्या मासिक सर्वेक्षणातून समोर आले.

भारतातील सेवा व्यवसायातील खरेदी व्यवस्थापकांचा कल दर्शविणारा 'एचएसबीसी इंडिया सर्व्हिसेस पीएमआय' निर्देशांक जुलै महिन्यात ५३.३ गुणांवर नोंदला गेला. निर्देशांकाची ही गेल्या ५३ महिन्यांतील नीचांकी पातळी आहे. जूनमध्ये निर्देशांक ५७.४ गुणांवर होता.

सेवा क्षेत्राचा निर्देशांक ५० गुणांवर नोंदला गेल्यास विस्तार तर ५० गुणांखाली नोंदला गेल्यास आकुंचन झाल्याचे मानले जाते. सेवा क्षेत्रातील मागणीत घसरण आणि स्पर्धात्मकतेत वाढ झाल्याने गेल्या महिन्यात नवीन व्यवसायाचा ओघ कमी झाला. गेल्या महिन्यात नवीन व्यवसायातील वाढीचा दर हा फेब्रुवारी २०२२ नंतरचा सर्वांत कमी नोंदविण्यात आला आहे.

Home First Finance Company India Limited

CIN: L65990MH2010PLC240703, Website: homefirstindia.com

Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com

अनु. 13(2) अंतर्गत मागणी सूचना

आपण, म्हणजे खाली नमूद कर्जदारांनी खाली वर्णन केलेल्या मालमत्ता तारण ठेवून कर्ज घेतले होते आणि आपण, म्हणजे खाली नमूद व्यक्ती सदर कर्ज करारासाठी कर्जदार / सह-कर्जदार जामीनदार होता. आपण परतफेडीत कसूर केल्याने सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (थोडक्यात सर्फेसी अधिनियम) मधील तरतुदींतर्गत आपले कर्ज खाते **दि. 04-07-2026 रोजी अनुत्पादक मत्ता** म्हणून वर्ग करण्यात आले आहे. आम्ही, म्हणजे होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड यांनी सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13(13) सह वाचण्यात येणारया अनु. 13(2) अंतर्गत आपण दिलेल्या पत्त्यावर मागणी सूचना जारी केली. सदर सूचना **दि. 03-08-2026 रोजी** जारी करण्यात आल्या आणि सदर सूचनांमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की आपण हमी दिलेल्या विविध कर्जांच्या परतफेडीत आपण कसूर केलेली आहे. त्यामुळे, सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13(2) मधील तरतूद आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3(1) मधील तरतुदींतर्गत आपणासाठी ही सूचना प्रकाशित करण्यात येत आहेः

अ. क्र.	खाते, कर्जदार व जामीनदाराचे नाव व पत्ता	ज्या अनामतीवर कारवाई करायची आहे तिचा तपशील	मागणी सूचनेच्या दिनांकानुसार एकूण थकबाकी अधिक पुढील व्याज व इतर खर्च (रु. मध्ये)
1.	अर्चनाराणी कमलेश आर्या, कमलेशकुमार जगमोहन	फ्लॅट क्र. ई -201, दुसरा मजला, गट क्र. 3430/2/1 ते 35, गट क्र. 3430/2/39 ते गट क्र. 3430/2/47, आनंदग्राम, तळेगाव ढमढेरे, तालुका शिरूर, पुणे - 412208., चतुःसीमा पुढीलप्रमाणे : पूर्व - खुली जागा, पश्चिम - फ्लॅट क्र 204, उत्तर - खुली जागा, दक्षिण - फ्लॅट क्र. 205.	6,10,658

याद्वारे आपणांस सदर सूचनेच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत वर नमूद रकमेचा व्याज व शुल्कांसह होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड यांचेकडे भरणा करण्याचे आवाहन करण्यात येते, अन्यथा होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड द्वारे सदर अधिनियमातील तरतुदींतर्गत सर्व किंवा कोणत्याही एका अनामत मत्तेविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात येईल ज्यात कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांच्या अनामत मत्तांचा ताबा घेण्याचाही समावेश असेल. सदर अधिनियमांतर्गत होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड यांना उपलब्ध असलेल्या अधिकारांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे (1) कर्जदार/जामीनदारांच्या अनामत मत्तेचा ताबा घेणे ज्यात लीझच्या योगे हस्तांतरण, अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी विक्रीचे अभिहस्तांकन करण्याचा अधिकार (2) अनामत मत्तेचे व्यावसाथापन आपल्या ताब्यात घेणे ज्यात लीझ, अभिहस्तांकन किंवा विक्रीच्या योगे हस्तांतरण करण्याचा अधिकाराचा आणि अनामत मत्तेची वसुली करण्याचा समावेश आहे आणि होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड यांचेद्वारे करण्यात येणारे हस्तांतरण हस्तांतरित करण्यात आलेल्या अनामत मत्तेच्या संदर्भातील सर्व अधिकार कंपनीस असतील जणू काही हे हस्तांतरण आपणच केलेले आहे. सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(13) मधील तरतुदींनुसार आपणांस होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड कडे तारण असलेल्या वर नमूद अनामत मत्तेचे होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड यांच्या लेखी पूर्व-परवानगीशिवाय विक्री, लीझ किंवा इतर कोणत्याही तरहेने (आपल्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त) हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्यात येतो.

ठिकाणः पुणे, दिनांकः 06-08-2026

स्वाक्षरी : प्राधिकृत अधिकारी, होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४१०००. **फॅक्स** - ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४००००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४०००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहिल्यानगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.

■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.